महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१७ वा | दिनांक : १७/१०/२०२५ | वार : शुक्रवार

# अजित पवार आणि शरद पवार पुन्हा एकत्र



**पुणे** : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरू झाली आहे. तसेच मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यातील भेटी वाढल्या असल्याचे पाहायला मिळाले. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यात देखील अनेकवेळा भेटी झाल्या असल्याचे समोर आले आहे.

बारामती येथे शरद पवार आणि अजित पवार यांनी विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संस्थेच्या वार्षिक सभेला हजेरी लावली. यावेळी अजित पवार आणि शरद पवारांमध्ये एका खुर्चीचे अंतर होते. या कार्यक्रमात अजित पवारांनी विद्या प्रतिष्ठानमधील विकास कामांची पाहणी केली.

शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, हे बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र आले आहेत. बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या शैक्षणिक संकुलातील व्हीआयटी सभागृहात ही सभा पार पडली. या बैठकीसाठी संस्थेचे अध्यक्ष म्हणून शरद पवार, विश्वस्त म्हणून अजित पवार आणि त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार, तसेच खजिनदार युगेंद्र पवार हे देखील उपस्थित होते. या वार्षिक सभेपूर्वी शरद पवार आणि अजित पवार यांच्यात संस्थेच्या कार्यालयात एक खासगी बैठकही झाली.

या दोन बड्या नेत्यांचे एकत्र येणे गेल्या चार दिवसांतील दुसरे सार्वजनिक दर्शन आहे. यापूर्वी, ते पुण्यात वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमधील एका महत्त्वाच्या बैठकीसाठी उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी राज्यातील साखर कारखान्यांच्या समस्या आणि साखर उद्योगासंदर्भातील महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली होती. संस्थात्मक व्यासपीठांवरून राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र येत, पवार कुटुंबीय त्यांचे महत्त्वाचे सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम एकत्रितपणे पुढे नेत असल्याचे या घटनांमधून स्पष्ट होते.

एकंदरीत, हे दोन्ही नेते राजकीय स्तरावर वेगवेगळ्या वाटांवर असले तरी, विद्या प्रतिष्ठान आणि वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटसारख्या संस्थांच्या कार्यासाठी ते एकत्र येत आहेत. बारामतीतील या शैक्षणिक संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते अध्यक्ष आणि विश्वस्त म्हणून उपस्थित राहून, संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेतील. संस्थात्मक बांधिलकी जपतानाच, पवार कुटुंबियांमधील सदस्यांचे असे एकत्र येणे राजकीय वर्तुळात लक्ष वेधून घेत आहे.

## ऐन दिवाळीच्या तोंडावर प्रवाशांना फटका! : एसटी आरक्षण प्रणाली ठप्प



**मुंबई** : एसटी बसच्या प्रवाशांना ऐन दिवाळीत नाहक त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. एसटी आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याने गावी प्रवास कसा करायचा असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे. आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याने याचा एसटी महामंडळाला देखील फटका बसत असल्याचे दिसत असून या नवीन प्रणालीमुळे कर्मचारीही वैतागले असल्याचे बोलले जात आहे.

एसटी आरक्षण प्रणाली सॉफ्टवेअर आणि कंपनीमध्ये दोन वर्षांपूर्वी महामंडळाने बदल केला होता. त्या माध्यमातून जुन्या आरक्षण प्रणालीच्या जागी नवीन आरक्षण प्रणाली आणण्यात आली. पण नवीन आरक्षण प्रणाली जास्तच किचकट असल्याने ऐन दिवाळी सणाच्या तोंडावरच ही प्रणाली बंद पडली असल्याने गावी जाणाऱ्या प्रवाशांना याचा फटका बसण्याचे शक्यता आहे.

एसटी आरक्षणाच्या नव्या प्रणालीमुळे कर्मचाऱ्यांना मेमो देणे, मशीन इश्यू करणे यासाठी पूर्वी एका गाडीसाठी आरक्षण मेमो प्रिंट काढताना एक कागद लागत होता. आता एकाच मेमोची प्रिंट काढण्यासाठी तीन कागद लागत आहेत. त्यामुळे एसटी महामंडळाचा खर्चही वाढला असल्याचे दिसून येत आहे.

तसेच आधीची आरक्षण प्रणाली चांगली आणि सोयीस्कर होती. पण आता जी आरक्षण प्रणाली आहे ती अतिशय अवघड आणि खूप किचकट करण्यात आली असल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे असल्याचे समजते. त्यामुळे केवळ प्रवासीच नव्हे तर एसटीचे कर्मचारी देखील या नव्या प्रणालीला वैतागले असल्याचे समजते.

दरम्यान, राज्य सरकारकडून एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान अर्थात बोनस देण्यात येणार आहे. तसेच १२ हजार रुपयांची उचल देखील देण्याची घोषणा करण्यात आली आहे. यासंदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी माहिती दिली होती. तसेच राज्य सरकारकडून ४८ हप्त्यांमध्ये कर्मचाऱ्यांची २२०० कोटी रुपयांची रक्कम देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

# सलमानचे वडील सलीम खान राज ठाकरेंच्या भेटीला

**मुंबई** : बॉलिवूडमधील दिग्गज पटकथालेखक आणि अभिनेता सलमान खान यांचे वडील सलीम खान यांनी गुरुवारी सकाळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानी भेट घेतली. या भेटीदरम्यान राज ठाकरे, त्यांची पत्नी शर्मिला ठाकरे आणि सलीम खान हे तिघेही 'शिवतीर्थ'च्या बाल्कनीत हसत-गप्पा मारताना दिसले.

सलीम खान आणि राज ठाकरे यांच्या या अचानक झालेल्या भेटीमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, या दोघांमधील भेटीमुळे राजकीय आणि सिनेसृष्टीतील वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे. या भेटीदरम्यान राज ठाकरे यांनी सलीम खान यांना 'शिवतीर्थ' निवासस्थान दाखवून दिले. राज ठाकरे आणि सलीम खान यांच्यातील संबंध हे फक्त राजकीय किंवा औपचारिक नाहीत, तर जुने मैत्रीपूर्ण नाते असल्याचे म्हटले जाते. काही वर्षांपूर्वी राज ठाकरे यांनीही सलमान खानच्या निवासस्थानी भेट देऊन संवाद साधला होता. त्यामुळे या भेटीचा सूर सदिच्छा आणि आपुलकीचा असल्याचे म्हटले जात आहे.

राज ठाकरे आणि सलीम खान यांच्या भेटीचा नेमका उद्देश स्पष्ट न झाल्याने अनेकांनी ही भेट दिवाळीपूर्व सदिच्छा भेट असावी, असा अंदाज व्यक्त केला आहे. दोघेही अनेक वर्षांपासून कलाक्षेत्राशी आणि समाजकार्याशी जवळून जोडलेले आहेत. राज ठाकरे हे स्वतः कलाप्रेमी आणि सिनेमा रसिक असल्याने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार त्यांच्याशी संपर्कात असतात. राज ठाकरेंच्या कार्यालयात आणि निवासस्थानी कलाविश्वातील व्यक्तिमत्त्वांचे सतत येणे-जाणे असते. सलीम खान यांची ही भेट त्याचा भाग असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, राज ठाकरे यांचे चित्रपट प्रेम मनसेच्या दीपोत्सवातही पाहायला मिळते. मनसेच्या दीपोत्सवाला चित्रपटसृष्टीतील दिग्गज हजेरी लावत असतात. यावर्षी उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मनसेच्या दीपोत्सवातचे उद्‌घाटन होणार आहे. सलीम खान यांनी राज ठाकरेंची भेट घेतल्याने मनसेच्या या वर्षाच्या दीपोत्सवाला उद्धव ठाकरेंसोबत सलीम खान देखील उपस्थिती लावणार असल्याच्या चर्चा सध्या सुरू झाल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ ऑक्टोबर २०२५

## अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्तांना प्रशासनाकडून धनादेश वाटप



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे घरांची पडझड व दुकानात पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले xहोते. नुकसानग्रस्तांना भाजपाचे युवा नेते शरण बसवराज पाटील, उपविभागीय अधिकारी दत्तात्रय शेवाळे व तहसीलदार गोविंद येरमे यांच्या हस्ते शासनाच्या वतीने आर्थिक मदतीचे धनादेश देण्यात आली.उमरगा तालुक्यात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे अनेकांच्या घरात पाणी गेले घर कोसळले. कपड्याचे शोरुम, किराणा दुकान आदी दुकानात पाणी शिरल्याने खूप नुकसान झाले तात्काळ पंचनामे करून अतिवृष्टीमुळे नुकसान झाले अशा कदेर, गुंजोटी, दाळिंब, येणेगूर, बेळंब व मुरूम आदी गावातील नुकसानग्रस्तांना उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील, उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे व उमरगा तहसीलदार गोविंद येरमे यांच्या हस्ते शासनाची मदत स्वरूपात धनादेश वाटप करण्यात आले. यावेळी उमरगा पंचायत समितीचे माजी सभापती मदन पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रफिक तांबोळी, डाॅ. विक्रम जिवनगे, रविंद्र ढंगे, योगेश राठोड, महालिंग बाबशेट्टी, गौस शेख, अमर भोसगे, बाबा शिकलगर, सुजित शेळके, महानंद कलशेट्टी, भाजप मुरुम मंडळ अध्यक्ष गणेश अंबर, सचिव राजु मुल्ला, मुरूमचे माजी उपनगराध्यक्ष श्रीकांत बेंडकाळे, श्रीराम राठोड, गुंजोटीचे माजी सरपंच शंकरराव पाटील, साधू गायकवाड, कदेर सरपंच सतिश जाधव, सुधिर चव्हाण, पंकज बनसोडे, धनराज जाधव, सिद्राम देशमुख, सुनिल पाटील, मनोज गुरव, महेश पाटील, पिंटू साखरे, तम्मा शेटगार, बाळू चौधरी, लिंबराज पाटील, योगेश पाटील, रवि देशमुख, सरपंच परशुराम देवकते, इक्बाल पटेल, सादिक चाकूरे, अब्दुल गुत्तेदार, अप्पू गुंजोटे, विजय सोनकटाळे, धनराज पाटील, दत्ता बिराजदार, शेषेराव पाटील, सैफन चौधरी, गणेश पाटील, मुस्तफा कागदी, सचिन नागोबा, चाँद गवंडी आदीसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सोबत फोटो




## रुपाली शिंदे हिची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड येथील शिक्षणमहर्षी स्व के के जाधव सर माध्यमिक व काशीनाथ पाटील प्राथमिक विद्यालयाची विद्यार्थीनी रुपाली शिंदे हीची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिक्षण महर्षी स्व के के जाधव सर माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी रूपाली अनंता शिंदे हिने दि. १४ आक्टोंबर रोजी संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक संपादन केले आहे. यामुळे तिची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच काशिनाथ पाटील प्राथमिक विद्यालयाचा विद्यार्थी मितांश धीरज अग्रवाल यानेही रौप्य पदक मिळवत विभागीय स्तरावर निवड झाली आहे. विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव सागर जाधव, प्र आ सचिन भामरे, प्र.मु दत्तात्रय गायके, क्रीडा विभाग प्रमुख दीपक जाधव, भगवान म्हैसमाळे, तसेच राहुल दणके यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## कन्नड तालुका स्तरीय शालेय मैदानी स्पर्धेच उदघाटन



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** तालुका क्रीडा समिती छत्रपती शिवाजी महाविद्यालय कन्नड आयोजित शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेच्या उदघाटन प्रसगी कन्नड शहर पोलीस स्टेशनं चे पोलीस उपनिरीक्षक चाँद मेडके व उपनिरीक्षक तिलकचंद पवार तालुका क्रीडा सकूल समिती सदस्य व मार्गदर्शक तालुका क्रीडा संयोजक मुक्तानद गोस्वामी राकेश निकम, किशोर जाधव आदीची प्रमुख उपस्तिथी होती काही स्पर्धेचे निकाल १००मी धावणेप्रथम अतुल गायकवाड दुतीय श्रावण नवले तृतीय ओमकार जाधव १७ वर्षा प्रथम मुले रामेश्वर जाधव दुतीय ताले पटेल तृतीय दिनेश गवळी मुली १४ वर्षाखालील प्रथम रेणुका आधाने दुतीय अक्षरा लोंढे तृतीय साक्षी जाधव गोळा फेक १४ वर्षाखालील मुली श्रद्धा जाधव कोमल गोराडे तृतीय श्वेता मोरे १४ वर्षाखालील मुलं प्रथम प्रतीक चव्हाण दुतीय जगदीश टोम्पे तिसरा तृतीय अमोल खंबाट १७ वर्षाखालील मुली साक्षी वैष्णव दुतीय मनीषा महेर तृतीय धनश्री गायके १७ वर्षाखालील मुलं प्रथम दिनेश गवळी दुतीय आदित्य थोरात तृतीय कृष्णा जाधव १९ वर्षाखालील मुलं प्रथम गौरव छान वाल मुली प्रथम पायल मोकासे दुतीय पुनम छानवाल तृतीय वैष्णवी घुगे या स्पर्धेचे पंच म्हणून राहुल दणके मुकेश राठोड अदनान पठाण राहुल चव्हाण रवी कुमार सोनकांबळे कडूबा चव्हाण निलेश पाटील राहुलचव्हाण प्रशांत नवले बाळू घुगे ऋषिकेश पांचाळ सतीश राठोड अमोल गंगावणे आदींनी परिश्रम घेतले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ ऑक्टोबर २०२५


# वाचनाभिरुचीने वैचारिक श्रीमंती अक्षर होते : प्रा. वा. ना. आंधळे



**एरंडोल :** शरीराला अन्नपाणी जसे गरजेचे असते त्याचप्रमाणे मन सक्षमतेसाठी वाचन आवश्यक असते.वाचनाने ज्ञानात भर तर पडतेच पण स्वतःचे जग आणि जगणे तो सुंदर करू शकतो.व्यक्तिमत्व विकासात वाचनाचे महत्व अनन्यसाधारण असून वाचनाची श्रीमंती भौतिक श्रीमंतीच्या तुलनेत केव्हाही अक्षर ठरते.असे मत प्रतिपादन एरंडोल नगर वाचनालयाचे कार्याध्यक्ष कवी प्रा.वा.ना.आंधळे यांनी काल दि. 15 ऑक्टोबर 2025 रोजी एरंडोल नगर वाचनालय आयोजित वाचन प्रेरणा दियानिमित्त उपस्थितांसमोर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष जगदीश ठाकूर होते.त्यांनीच कार्यक्रमाच्या आयोजनासंदर्भाचा विचार मांडीत प्रास्ताविक केले. याप्रसंगी वाचनालयाचे गेल्या पन्नास वर्षापासून सभासद असणाऱ्या अशा नियमित वाचकांचा सत्कार करण्यात आला.त्यात वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत डॉ.के.ए. बोहरी, माजी नगर सेवक सुरेश खुरे,बालाजी उद्योग समुहाचे प्रमुख दिनेशजी काबरा,डॉ.सुहास अग्निहोत्री,शरद चौधरी,दगडू सोनार,प्रेमसिंग ठाकूर,मधुकर रोकडे,नरेंद्र पाटील,तुकाराम कुडोळ, योगेश महाले याना शाल पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. वाचनालयाचे अध्यक्ष जगदीश ठाकूर यांनी वाचन संस्कृती ही समाज व राष्ट्रहितासाठी किती आवश्यक आहे असे सांगत आज रोजी वाचनालयात भरवलेल्या पुस्तक प्रदर्शनासह वाचनालयाच्या माध्यमातून असे विविध अभिनव उपक्रम वर्षभरात घेऊन वाचनाभिरुची वाढीस लावू हा विश्वास व्यक्त केला.तर चिटणीस रविंद्र लाळगे सर यांनी डॉ.अब्दुल कलाम यांच्या समृद्ध वाचनावर भाष्य करीत वाचनाचे महत्व विशद केले.सत्काराला उत्तर देतांना सत्कारार्थी डॉ.बोहरी यांनी मी माणूस म्हणून जे घडलो ते केवळ वाचनाभिरुचिमुळे असे सांगत मी पन्नास वर्षात हजारो पुस्तके वाचून झाल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन कवी पत्रकार तथा वाचनालयाचे संचालक प्रवीण महाजन यांनी केले. कार्यक्रमास सर्व संचालक डॉ.पळशीकर,परेश बिर्ला,सहचिटणीस संतोष वंजारी,गुरुदास पाटील,ग्रंथपाल देवेंद्र वंजारी,कर्मचारी अग्निहोत्री,गोकुळ मोरे व वाचक बहुसंख्येने उपस्थित होते.आभार संचालक परेश बिर्ला यांनी मानले

# 'नैराश्य' हा लघुपट दाखवून विद्यार्थ्यांमध्ये केले प्रबोधन




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग व आरोग्य समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा रूग्णालय, जालना यांच्या सहकार्याने दि 14 ऑक्टोबर रोजी "डॉक्युमेंट्री फिल्म आणि व्याख्यान" आयोजित करण्यात आले होते. यावेळी 'नैराश्य' हा लघुपट दाखवून विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य म्हणजेच डिप्रेशनची वाढती समस्या किती जास्त प्रमाणात वाढत चालली आहे याविषयी चिकित्सा मानसशास्त्रज्ञ डॉ. प्रदीप शिंदे यांनी मार्गदर्शन केले. मनोविकार, मेंदू विकार, भावनिक असंतुलन, चिंता, ताण-तणाव इ. यासारख्या तरूणांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा उहापोह त्यांनी यावेळी केला.प्रारंभी मनोचिकित्सक परिचारिका किरण निर्मल यांनी मानसिक दृष्ट्या आजारी व्यक्तींचा अभ्यास कसा करावा? त्यांचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून कसे परीक्षण करावे? त्यांची व्यष्टि अभ्यास कसा तयार करावा ? डिप्रेशन व त्याची कारणे काय? यासह अनेक मानसिक आजारावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. स्मिता निर्मल म्हणाल्या की, शारीरिक आरोग्याइतकेच आपले मानसिक आरोग्यही महत्त्वाचे असते मात्र बऱ्याच जणांना हे आरोग्य सांभाळता येत नाही, त्यामुळे नैराश्य, मूड डिसऑर्डर, स्किझोफ्रेनिया, फोबिया, पॅनिक अॅटॅक, व्यक्तिमत्वासंबंधी समस्या, व्यसनाधिनता यासारख्या विविध मानसिक विकृतींनी व्यक्ती पछाडलेल्या असतात. या सर्वांवर खात्रीशीर उपचार करणे गरजेचे आहे. त्यासाठी मानसोपचार तज्ञांचे मार्गदर्शन घेणे, समुपदेशन घेणे त्याचबरोबर औषधोपचार घेणे हे गरजेचे असून व्यक्तींनी आपणाला झालेला कोणताही आजार लपवून न ठेवता तो सांगणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टीकोनाचा विकास होण्यासाठी त्यांना शारिरीक आणि मानसिक आरोग्य सांभाळता येणे गरजेचे आहे, या गोष्टीचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रूजवण्याचा प्रयत्न या उपक्रमाद्वारे करण्यात आला.लघुपट दाखवल्यानंतर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून चिकित्सा मानसशास्त्रज्ञ डॉ. प्रदीप शिंदे आणि डॉ. सोनाजी भूतेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा. डॉ. पवन देशमुख यांनी केले. सदरील उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्या डॉ. कविता प्राशर यांनी शुभेच्छा दिल्या. आरोग्य समिती सदस्य प्रा.डॉ. स्वाती पुरी, महाविद्यालयाचे अंतर्गत मूल्यमापन कक्षाचे समन्वयक डॉ. कल्याण कुंभार, डे-केअर सेंटरच्या जया मघाडे आणि प्रतिभा कोकणे यांनी परिश्रम घेतले

# दिवाळी

अंधाराला प्रकाशाचे अस्तित्व देऊ चला
अज्ञानाला ज्ञानाचे अस्तित्व देऊ चला

दु:खांना आकाशात नेऊन सोडूया
बदल्यात आनंदाचे रंग आकाशात उधळू या

पूजेवरील नि घरातल्या लक्ष्मीला दंडवत करुया
सदैव आमच्या आयुष्यात राहा अशी शपथ घालूया

आपापल्यात गोडवा वाटूया
दुरावलेली नाती जवळ आणूया

दारासमोरील रांगोळीत
अख्खा इंद्रधनुष्य आणूया

फुलांनी,झगमगाट लाईटांनी,दिव्यांनी
रंगबेरंगी रोषणाईनी सर्व घर सजवूया

या दिवाळीला आपल्यासोबत
दु:खे विसरुन आनंद साजरा करुया

उंच आकाशातून,आतिषबाजीतून
आनंदाचे रंग उडवून मनातला आनंद
साऱ्या जगाला दाखवूया.. सांगूया...

**लक्ष्मण वाल्डे-कन्नड**
छत्रपती संभाजीनगर
मो.नं- ८८८८६०६०६८

# सण दिवाळीचा आला

आला आला आला सण दिवाळीचा आला
सुट्टी लागली शाळेला चला मामाच्या गावाला

लाडू चिवडयाच्या संग
सारे फराळ खाऊया
नवे कपडे घालून
सारे फटाके फोडूया

अभ्यासाचा ताण नको आता पाटी पेन्सिलला
आला आला आला सण दिवाळीचा आला

अंगणात मातीमध्ये
खेळ सारे खेळूया
पळणारा चांदु मामा
ढगांमध्ये शोधूया

रात्र होता चांदण्याची गप्पा मारायला चला
आला आला आला सण दिवाळीचा आला

हसू खेळू मजा करू
गोड गाणी गाऊया
दिवाळीच्या रांगोळीत
रंग सारे भरुया

सज्ज सारे बालगोपाल दिवाळीच्या सणाला
आला आला आला सण दिवाळीचा आला

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
मो.9403384889

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ ऑक्टोबर २०२५


## आपण धर्माचे किल्ले बांधतोय परंतु माणुसकीचा पाया ढासळत चालला आहे - डॉ. ललित अधाने



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** आज समाज आरशात आपलं रूप पाहतो आहे पण त्या आरशात आता चेहरा नाही तर मुखवट्यांचं साम्राज्य उभं आहे.विचारांची झाडं अजूनही जिवंत आहेत पण त्यांच्या फांद्यांवर जातीय द्वेषाची वटवाघुळे बसली आहेत.आपण विकासाच्या घोषणा देतो पण त्या घोषणांच्या मागे उपाशी पोटाचा आवाज दबला जातो आहे.आपण धर्माचे किल्ले बांधतोय परंतु माणुसकीचा पाया ढासळत चालला आहे. संभाजीनगर येथीलकविवर्य पद्मश्री नारायण सुर्वे काव्य मंचच्या वतीने यावर्षीचा ‘कविवर्य पद्मश्री नारायण सुरवे काव्यभूषण गौरव पुरस्कार - 2025’ हा कवी डॉ. ललित अधाने यांना प्रदान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.ते पुढे म्हणाले की कायद्याच्या पुस्तकाला मुखपृष्ठ आहे पण न्यायाचा आत्मा हरवत चालला आहे शहरांत दिवे पेटलेत पण विवेकाचा दिवा विझला आहे.गावांत शेतकरी अन्न पिकवतो परंतु त्यांच्या अंगाला कपडा आणि पोटाला तुकडा उरत नाही. आसवांच्या महापुरात हरवलेल्या शेतकऱ्यांकडे पाहायला आणि त्यांचे अश्रू पुसायला हल्ली कुणालाच वेळ उरलेला नाही. सदरील पुरस्कार ज्येष्ठ कवी डॉ. प्रभाकर शेळके यांच्या हस्ते पाच हजार रुपये रोख रक्कम, शाल, श्रीफळ,स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन अधाने यांना सन्मानित करण्यात आले. त्यावेळी कवी प्रभाकर शेळके यांनी ललित अधाने यांच्या कवितेवर भाष्य केले. ते म्हणाले- डॉ. ललित अधाने यांचा 'माही गोधडी छप्पन भोकी' हा कवितासंग्रह हा नव्वदोत्तर ग्रामीण कवितेच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. हा संग्रह केवळ ग्रामीण जीवनाचे भावनिक चित्रण करत नाही, तर समकालीन शेतकरी, कष्टकरी आणि गाव-खेड्यातील माणसांच्या जीवनातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संघर्षाचा एक विद्रोही आणि परखड दस्तावेज ठरतो. हा संग्रह ग्रामीण साहित्यात विद्रोह आणि आत्मभानाची परंपरा पुढे घेऊन जातो. शेतकरी वर्गाचे दु:ख आणि संघर्ष मांडताना कवीने जी तीव्र भाषा आणि विद्रोही भूमिका घेतली आहे, ती मराठी कवितेला नवी दिशा देणारी आहे. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हा गौरव समारंभ कविवर्य पद्मश्री नारायण सुरवे काव्य मंचच्या वतीने मुकुंदनगर येथील जगद्गुरु संत शिरोमणी संत तुकाराम सभागृहात आयोजित करण्यात आला होता.पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्षस्थान मंचचे अध्यक्ष कवी दत्तात्रय शेभराव ठुबे पाटोदकर यांनी भुषविले.त्यांनी कवी ललित अधाने यांच्या 'माही गोधडी छप्पन भोकी' या कवितासंग्रहाची निवड या पुरस्कारासाठी का करण्यात आली याविषयीची भूमिका आपल्या भाषणातून मांडली. कविसंमेलनाचे उद्‌घाटन शिवराज पटणे यांच्या हस्ते करण्यात येऊन नारायण सुर्वे यांच्या कवितांचे वाचन करण्यात आले.या प्रसंगी मेजर निखिल विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती. कवयित्री सुनिता कपाळे, कवी विशाल पांचाळ यांच्यासह विविध मान्यवर साहित्यप्रेमी, कवी, आणि रसिक उपस्थित होते. सूत्रसंचालन कवी मधुकर दिवेकर यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर चव्हाण यांनी मानले.

## शिवाजी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन विविध कार्यक्रमाने साजरा



**कन्नड :** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या वतीने वाचन प्रेरणा दिन विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. विजय भोसले, यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. समाजात वाचन संस्कृती रुजविण्याची गरज असून त्यासाठी सर्वांनीच पुढाकार घेतला पाहिजे. गावोगावी ग्रंथालये व वाचन कट्टे सुरू करणे आवश्यक आहे. असे विचार त्यांनी मांडले.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर , उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. वाचन प्रेरणा दिना निमित्त प्रसिद्ध कवयित्री व विचारवंत डॉ. प्रतिभा अहिरे यांचे वाचनाचे महत्व व वाचनाचे बदलते स्वरूप या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी वाचनाचे महत्व सांगून वाचन प्रत्येकाच्या जीवनात किती आवश्यक आहे हे सांगून वाचनाचे बदलते स्वरूप, वाचनामुळेच आपण घडल्याचे मत व्यक्त केले. ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त दुर्मिळ ग्रंथ व अंकाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. विद्यार्थ्यांना ग्रंथाविषयी व अंका विषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. तर सूत्रसंचलन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक यांची उपस्थिती होती.






## वाचन संस्कृती रुजविण्यासाठी सामुहिक प्रयत्नाची गरज - डॉ. शिवाजी हुसे

**छत्रपती संभाजीनगर :** सद्य परिस्थितीमध्ये वाचनाकडे समाजातील सर्वच घटकांचे प्रचंड दुर्लक्ष होत आहे. पुस्तकाची निर्मिती मोठया प्रमाणात होत आहे मात्र पुस्तक वाचनाकडे दुर्लक्ष होत असून मोबाईलच्या विळख्यात आपण जास्तच अडकत चाललो आहे. वाचन संस्कृती रुजल्या शिवाय समाज विवेकी व सुसंस्कृत होणार नाही. वाचन संस्कृती रुजविणे केवळ कुणा एकट्याची जबाबदारी नाही , वाचन संस्कृती रुजविण्यासाठी सामुहिक प्रयत्नाची गरज असल्याचे प्रतिपादन तिफण वाचक चळवळीचे प्रवर्तक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. ( ता. 15 ) वाचन प्रेरणा दिना निमित्त येथील मौलाना आझाद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. हुसे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. आरिफ पठाण होते. प्रारंभी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. पुढे बोलतांना डॉ. हुसे म्हणाले की, वाचन संस्कृती रुजविण्यासाठी नव्याने प्रयत्न करावे लागतील त्यासाठी वाचन कट्टे, वाचन संस्कार केंद्र, पुस्तक भिसी, बुक क्लब , पुस्तक चर्चा, सामुहिक वाचन असे उपक्रम करावे लागतील, त्यासाठी शिक्षक, प्राध्यापक यांनी पुढाकार घ्यावा लागेल. वाचन प्रेरणा दिनी वाचन संस्कृती साठी काम करण्याचा व वाचनाचा संकल्प करूया ! असेही मत त्यांनी मांडले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. आरिफ पठाण यांनी केला. प्रास्ताविक प्रा. सुनिल दाभाडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डाॅ. मनोहर बन्सवाल यांनी करून दिला. सूत्रसंचलन डाॅ. विकास वाघमारे यांनी तर आभार प्रा. गणेश निसर्गंध यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ ऑक्टोबर २०२५

## हत्तीदादा हत्तीदादा

हत्तीदादा हत्तीदादा
किती वाढलात राव
मॉर्णिगवाकचे कधी
घेत नाही नाव

शेपूट किती आखूड
सुपासारखे कान
भूक लागली की
गाठता ऊसाचे रान

सोंडेने पाणी उडवून
अंघोळ करता छान
धिंगा मस्ती करता
हरपून देहभान

डुलत डुलत चालता
झाडपाला खात खात
शोभून किती दिसतात
दोन शुभ्र दात

तुमच्या शांत स्वभावाचे
किती गाऊ गोडवे
राग आल्यावर मात्र
झाड करता आडवे

शक्तीशाली म्हणून
तुमची सर्वत्र ख्याती
मग चिमुकल्या मुंगीची
का वाटते भीती?

**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.9011559106**

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# गरिबी निर्मूलन : समानतेच्या नव्या युगाकडे वाटचाल

दरवर्षी 17 ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन' म्हणून पाळला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने 1993 पासून या दिनाचे औपचारिक स्वरूप सुरू झाले. या दिनामागचा उद्देश केवळ आर्थिक आकडेवारीवर प्रकाश टाकणे नसून, गरिबीच्या सामाजिक, राजकीय आणि मानवी पैलूंवर चिंतन करणे हा आहे. या दिवसाचे प्रतीकात्मक महत्त्व असे की, जगातील सर्वात वंचित आणि उपेक्षित लोकांच्या आवाजाला ऐकले जावे, त्यांच्या संघर्षाची दखल घेतली जावी आणि समान संधींचे दार सर्वांसाठी खुले व्हावे. गरिबी ही केवळ पैशांचा अभाव नाही, तर ती सन्मान, शिक्षण, आरोग्य आणि संधी यांचा अभाव आहे. ती माणसाच्या मानवी हक्कांवर आघात करते. जागतिक बँकेच्या जून 2025 च्या अहवालानुसार, 2022 मध्ये सुमारे 838 दशलक्ष (83 कोटी 80 लाख) लोक अजूनही अत्यंत गरिबीत जीवन जगत आहेत. हे प्रमाण जगाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास 10 टक्के आहे. 2025 मध्ये जागतिक बँकेने अत्यंत गरिबीची नवी व्याख्या निश्चित केली असून, त्याव्याख्येमध्ये 2021 च्या क्रयशक्ती समतोल प्रमाणे दररोज प्रती व्यक्ती 3 डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्न असलेली व्यक्ती "अत्यंत गरीब" समजली जाते. या आकडेवारीतून स्पष्ट होते की आधुनिक तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि प्रगतीच्या घोषणांनंतरही जगात गरिबीचे संकट टिकून आहे. उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशिया हे अजूनही सर्वाधिक प्रभावित प्रदेश आहेत. हवामान बदल, युद्धस्थिती, बेरोजगारी आणि महागाई यामुळे गरीब वर्गावर सर्वाधिक परिणाम झाला आहे.

भारतातील परिस्थितीही वेगळी नाही. गेल्या दोन दशकांत भारताने विकासाच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली, लाखो लोकांना गरिबीरेषेबाहेर आणले, तरीही अजूनही ग्रामीण भारतातील मोठा वर्ग बहुविमीय गरिबीच्या छायेखाली जगतो. राष्ट्रीय बहुविमीय गरिबी निर्देशांक 2024 नुसार, भारतातील जवळपास 11.3 टक्के लोक अजूनही बहुविमीय गरिबीत असून, त्यांना शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, पोषण आणि रोजगार यांसारख्या मूलभूत गरजांपासून वंचितता भासत आहे. गरिबीचा उगम केवळ आर्थिक नाही. ती सामाजिक विषमता, जातीय असमानता, लिंगभाव असमानता, शिक्षणाचा अभाव आणि संसाधनांच्या असमान वाटपाशी निगडित आहे. ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर, आदिवासी, स्थलांतरित कामगार आणि महिला हे या दुष्चक्राचे सर्वात मोठे बळी ठरतात. महिलांच्या बाबतीत तर गरिबीचे ओझे दुप्पट असते, कारण त्यांना घरगुती जबाबदाऱ्या, आरोग्यसेवेचा अभाव, कमी शिक्षण आणि वेतनातील अन्याय यांचा सामना करावा लागतो.

संयुक्त राष्ट्रांचे 'शाश्वत विकास उद्दिष्टे' या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे ठरते. 'शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पहिल्या उद्दिष्टातच स्पष्ट म्हटले आहे की 'End Poverty' म्हणजेच 2030 पर्यंत जगभरातून गरिबी संपवणे. परंतु हे लक्ष्य गाठण्यासाठी फक्त सरकारी योजना पुरेशा नाहीत. सामाजिक जागरूकता, नागरिकांचा सहभाग आणि नैतिक जबाबदारी यांचा संगम होणे आवश्यक आहे. भारत सरकारने गरिबी निर्मूलनासाठी अनेक प्रभावी योजना राबविल्या आहेत. प्रधानमंत्री जनधन योजनेने आर्थिक समावेशनाची दारे उघडली; मनरेगाने ग्रामीण रोजगाराची हमी दिली; प्रधानमंत्री आवास योजनेने घरविहीनांना आश्रय दिला; उज्ज्वला योजनेने स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन पुरविले; तर राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याने सर्वसामान्य नागरिकांना अन्नाचा हक्क दिला. या योजनांचा उद्देश 'अंत्योदय' होय. म्हणजे समाजातील सर्वात शेवटच्या माणसापर्यंत विकासाचा लाभ पोहोचवणे हा आहे.

तथापि, या सर्व योजनांची अंमलबजावणी तळागाळात प्रभावीपणे व्हावी यासाठी पारदर्शक यंत्रणा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे सशक्तीकरण आवश्यक आहे. काही वेळा निधीचा अपुरा वापर, माहितीचा अभाव आणि प्रशासनातील भ्रष्टाचारामुळे योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे गरिबी निर्मूलनासाठी आर्थिक सुधारणा बरोबरच प्रशासनिक सुधारणा सुद्धा तितक्याच गरजेच्या आहेत. गरिबी निर्मूलनाचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे शिक्षण आणि कौशल्यविकास होय. आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानाधारित युगात शिक्षण हे केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन नाही, तर आत्मनिर्भरतेचे मूळ आहे. शिक्षणामुळे माणूस केवळ रोजगारक्षम होत नाही, तर तो सामाजिक बदलाचा घटक बनतो. म्हणूनच गरिबीविरोधी लढाईत प्राथमिक शिक्षण, स्त्री शिक्षण आणि तांत्रिक शिक्षणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

शहरीकरणाच्या वेगामुळे 'शहरी गरिबी' ही नवी समस्या निर्माण झाली आहे. महानगरांतील झोपडपट्ट्या, अस्थिर रोजगार, आरोग्याच्या समस्या आणि घरांच्या टंचाईमुळे गरिबीचे नवे रूप तयार झाले आहे. ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर झाल्यानंतरही लोकांना सन्मानजनक जीवनमान मिळत नाही. त्यामुळे गरिबीविरुद्धच्या लढाईत ग्रामीण आणि शहरी विकासाचा संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे. सामाजिक न्याय आणि आर्थिक समता यांचा संगम साधणे हेच खरे गरिबी निर्मूलनाचे सूत्र आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाजातील दुर्बल घटक मागे राहू नयेत यासाठी संसाधनांचे पुनर्वाटप, महिलांचे सक्षमीकरण, तसेच आरोग्य आणि पोषणावर अधिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. भारतात महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांनी ग्रामीण भागात आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे. हे गट महिलांना केवळ बचतीची सवयच लावत नाहीत, तर लघुउद्योग, हस्तकला आणि उद्योजकतेच्या संधीही उपलब्ध करून देतात.

गरिबी निर्मूलनासाठी औद्योगिक क्षेत्र आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभागही महत्त्वाचा आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत वेगवेगळ्या कंपन्या शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्यासाठी योगदान देतात. या प्रकारचा खाजगी क्षेत्राचा सहभाग सार्वजनिक धोरणांना बळकटी देतो. गरिबी ही माणसाच्या मानसिकतेवरही परिणाम करते. ती आत्मविश्वास कमी करते, सामाजिक विभागणी वाढवते आणि निराशा निर्माण करते. त्यामुळे गरिबीविरुद्धची लढाई ही केवळ आर्थिक नसून, ती मानवी सन्मान आणि आत्मविश्वास पुनर्संचयित करण्याची लढाई आहे.

आज जग हवामान बदल, युद्ध, महागाई आणि अन्नसुरक्षेच्या संकटात अडकले आहे. या सर्व समस्यांचा सर्वाधिक फटका गरीब लोकसंख्येलाच बसतो. त्यामुळे हवामान न्याय आणि सामाजिक न्याय यांना एकत्रित दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. भारतातील अनुभव सांगतो की, जेव्हा विकासाचा केंद्रबिंदू 'माणूस' ठरतो, तेव्हा प्रगतीचा प्रवाह सर्वांसाठी खुला होतो. डिजिटल व्यवहार, थेट लाभ हस्तांतरण आणि ग्रामीण पायाभूत सुविधा यामुळे पारदर्शकता वाढली आहे. परंतु शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तीन क्षेत्रांत अद्याप सर्वसमावेशक सुधारणा आवश्यक आहेत.

शेवटी, गरिबी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नाही, तर तो संपूर्ण समाजाचा सामूहिक संकल्प आहे. आपण एका गरीब व्यक्तीकडे दयेने नव्हे तर सन्मानाने पाहिले, तर खऱ्या अर्थाने सामाजिक समता निर्माण होईल. 'गरिबी ही नियती नाही, ती अन्यायाचा परिणाम आहे' ही जाणीव प्रत्येक नागरिकात रुजली पाहिजे. या आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिनानिमित्त आपण हे ठरवूया की कोणतेही धोरण, योजना किंवा प्रगती तेव्हाच अर्थपूर्ण ठरेल, जेव्हा ती समाजातील सर्वात शेवटच्या माणसापर्यंत पोहोचेल. 'अंत्योदय' हीच खरी प्रगती आहे. गरिबीविरुद्धची लढाई म्हणजे मानवतेच्या समानतेसाठीचा संघर्ष आहे, आणि हा संघर्ष आपल्याला अधिक न्याय्य, समतामूलक आणि सशक्त जगाकडे नेईल.



***डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582,**
ईमेल –
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002